पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक:नस/५/कावि/७४२/२०२१
दिनांक : ०९ / ०७/२०२१

प्रति,

मा. ..................................
सदस्य,पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

**विषय** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०७/२०२१ रोजी दुपारी २.००वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **जुलै-२०२१** ची मासिक मा.महापालिका सभा **मंगळवार** दिनांक **२०/०७/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता मा.उपसचिव महाराष्ट्रशासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दिनांक ३ जुलै २०२० व दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित करणार आहेत. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे सभागृहातून ऑनलाईन पध्दतीने अथवा मोबाईल ऍपद्वारे सहभागी व्हावे ही विनंती.

आपला विश्वासू

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

## <u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.</u>

**<u>सूचना</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

**<u>कार्यपत्रिका क्रमांक-६०</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **जुलै-२०२१** ची मासिक मा.महापालिका सभा **मंगळवार** दिनांक **२०/०७/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दिनांक ३ जुलै २०२० आणि दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित करणार आहेत. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

-----

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

**<u>मा.स्थायी समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक १)** संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/८/कावि/५०/२०२१,
दि.१७/०५/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९५१८ दि.२७/०५/२०२१

पिंपरी चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीसआयुक्त कार्यालय दि.१५/०८/२०१८ पासून नव्याने सुरु झालेले आहे. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड यांचेकडीलपत्र क्र.पोउआ/परि.२/बांधकाम/२०८८/२०२१, दि.१५/०४/२०२१ व दि.२३/१२/२०२०नुसार परिमंडळ-२ च्या हद्दीतील सांगवी, वाकड, हिंजवडी, चिखली, देहुरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी हे ७ पोलीस स्टेशन तसेच शिरगाव व रावेतस्वतंत्र पोलीस चौकी हा भाग येतो. सदर ठिकाणी पोलीस विभागाचे कार्यालय सुरुझाल्यास कायदा सुव्यवस्था व प्रशासकिय कामकाज करणे सोईचे होणार आहे. तसेचपोलीस आयुक्तालयातील अधिकारी वर्गासाठी स्वतंत्र निवासस्थान उभारता येऊशकते. याकरीता खालील I to R ची जागा सुविधा भुखंडाची मागणी केलेली आहे.

| अ.क्र. | गावाचे नांव व स.नं . | जागेचा तपशील | क्षेत्रपळ |
|---|---|---|---|
| १ | मौजे वाकड स.नं. १११/१/१मधील१८ गुंठे | मौजे वाकड I to Rचे बदल्यात मिळालेली मोकळी जागा सुविधा भुखंड | मोकळी जागा१८ गुंठे- १७९१.८६चौ.मी.१९२८७.५८चौ.फुट |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मौजे पुनावळे स.नं. १२/१ ते ७ पै.मधील ३.५ गुंठे | मौजे पुनावळे I to Rचे बदल्यात मिळालेली मोकळी जागा सुविधा भुखंड | मोकळी जागा-३.५ गुंठे- ३५३.२७४चौ.मी.३८०२.५९चौ.फुट |

मागणी केलेली जागा I to R चे बदल्यात मनपास मिळालेली आहे. सदर सुविधा भुखंड पोलीस विभागास ३० वर्षाच्या कालावधीसाठी पि.चिं. मनपाचे उप संचालक नगररचना, विभाग हे निर्धारित करतील त्यादराने भुईभाडे आकारुन दर ५वर्षानंतर प्रचलित दराने भाडे वाढ सादर करुन ३० वर्षाच्या कालावधीकरिता देण्याचा प्रस्ताव आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ पिंपरी चिंचवडकरीता मौजे वाकड स.नं.१११/१/१ पैंकी येथील १८ गुंठे व मौजै पुनावळेस.नं.१२/१ ते ७ पै. मधील ३.५ गुंठे I to R ची मोकळी जागा सुविधा भुखंड पिं.चिं.म.न.पा.च्या नियम/अटी शर्तीनुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ चे कार्यालयास ३० वर्षाच्या कालावधीसाठी दर ५ वर्षाने प्रचलित दराने भाडेवाढ या अटींस अधिन राहून भुई-भाड्याने वापरासाठी देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ कनुसार मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक – २) संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्तयांचे पत्र क्र.प्रशा/११/कावि/२९५/२०२१, दि.१८/०६/२०२१
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९८०५ दि.२३/०६/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ व ६७ मधील तरतूदीस अनुसरुन मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.७४८५ दि.१६/९/२०२० व मा.महापालिका सभा ठराव क्र.५७० दि.१३/१०/२०२० यांचे मान्यतेने मा.आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र.प्रशा/११/कावि/४८५/२०२० दि.२६/१०/२०२० व क्र. प्रशा/११/कावि/१२८/२०२१ दि.१०/३/२०२१ अन्वये २४ मार्च, २०२० ते १७ मे, २०२० व १४ जुलै, २०२० ते २३ जुलै, २०२० या ६५ दिवसाच्या लॉकडाऊन कालावधीमध्ये कोरोना विषयक काम करणारे महानगरपालिका विविध विभागाकडील कर्मचारी, मानधनावरील, ठेकेदाराकडे काम करीत असलेलेकर्मचारी, प्रशिक्षणार्थी (कोपा-पासा) तसेच भांडार विभाग व इतर विभागातील कर्मचारी यांना प्रत्यक्ष केलेल्या कामांच्या प्रमाणात हजर दिवसाप्रमाणे प्रतिदिन १५०/- (अक्षरी- र.रु एकशे पन्नास फक्त) प्रोत्साहन भत्ता मंजूर करणेत आला आहे. सद्स्थितीतील“कोरोना” विषाणू (COVID-19) दुसरी लाट असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात कोविड-१९ बाधित रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. “कोरोना विषाणू” (COVID-19) प्रादूर्भाव रोखण्यासाठी निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करणेच्या अनुषंगाने कोरोना विषाणूमुळे निर्माण झालेल्या आजाराचे पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपायोजना करणे करिता मनपाच्या वतीने उपाययोजना करणेत येत आहेत.“कोरोना विषाणू” (COVID-19) चे काळात कामकाज करणा-या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयासह महापालिका रूग्णालय / दवाखाना येथील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना स्वतंत्र कोविड भत्ता अदा करणेबाबत वैद्यकिय मुख्य कार्यालयामार्फत दि.१९/०५/२०२१ रोजी मा.आयुक्त सो यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला होता .त्यानुसार महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय तसेच मनपाची इतर रूग्णालये व दवाखाने याठिकाणी कोविड-१९ च्या काळात मानधनावर कार्यरत असलेल्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी /वैद्यकिय अधिकारी तसेच दंत शल्यचिकीत्सक यांना र.रु.१५०००/- , स्टाफ नर्स व सर्व पॅरामेडीकल स्टाफ यांना

र.रु.१०,०००/- तसेच प्रयोगशाळा सहाय्यक/वर्ग ४ मधील कर्मचारी यांना र.रु.५,०००/- याप्रमाणे मासिक वेतनाव्यतिरिक्त स्वतंत्र कोविड भत्ता १ एप्रिल २०२१ पासून ३० जून २०२१ अखेर दरमहा अदा करणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९४५०, दि.१२/०५/२०२१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यासंदर्भातील कार्यवाही वैद्यकिय विभागाकडून करणेत आलेली आहे. त्याच धर्तीवर, महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय तसेच मनपाची इतर रूग्णालये व दवाखाने याठिकाणी कोविड१९च्या काळात आस्थापनेवर कार्यरत असलेले वैद्यकिय तांत्रिक संवर्गातील अधिकारी /कर्मचारी यांना खालील देय प्रमाणे कोविड भत्ता मंजुरी बाबत प्रस्तावित केले आहे.

| अ.क्र. | महापालिका रुग्णालय/दवाखानामधील स्थायी अस्थापनेवरील कार्यरत वैदयकीय तज्ञ / वैदयकीय अधिकारी/इतर कर्मचारी | स्वतंत्र कोविड भत्ता र.रु. |
|---|---|---|
| १ | वर्ग १ व २ | १५,०००/- |
| २ | वर्ग - ३ | १०,०००/- |
| ३ | वर्ग४- | ५,०००/- |

प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही प्रशासन विभागामार्फत करणेबाबत मा.अति.आयुक्त (१) यांना शेरांकन केले आहे सदर शेरांकनानुसार मा.आयुक्त् सो. मान्यता दिलेली आहे. सादर करणेत आलेल्या प्रस्तावानुसार नमुद देयनुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | वर्ग | एकूण कर्मचारी संख्या | | एकूण | दरमहा कोविड भत्ता | एकूण र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वैद्यकिय | वायएच.एम.सी. | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ (३+४) | ६ | ७ (५X६) |
| १ | वर्ग-१ | १६ | ६८ | ८४ | १५,०००/- | १२,६०,०००/- |
| २ | वर्ग-२ | ७४ | १४ | ८८ | १५,०००/- | १३,२०,०००/- |
| ३ | वर्ग-३ | ३०६ | २८१ | ५८७ | १०,०००/- | ५८,७०,०००/-- |
| ४ | वर्ग-४ | २४६ | १५१ | ३९७ | ५,०००/- | १९,८५,०००/- |
| **एकूण** | **वर्ग १ ते ४** | **६४२** | **५१४** | **११५६** | **--** | **१,०४,३५,०००/-** |

वरील प्रमाणे कोविड भत्ता संबंधितांना अदा करावयाचा झाल्यास माहे १ एप्रिल २०२१ ते ३०जून २०२१ करिता एकूण खर्च र.रु.१,०४,३५,०००/- (अक्षरी र.रु. एक कोटी चार लाख पस्तीस हजार फक्त) प्रतिमाह अपेक्षित आहे. सदरचा कोविड भत्ता माहे १ एप्रिल २०२१ ते ३० जून २०२१ करिता कालावधीमध्ये मंजूर करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार वरील दराने कोविड भत्ता अदा करणेस तसेच जागतिक महामारी कोविड-१९ अंतर्गत कामकाज करणा-या मानधनावरील वैद्यकिय अधिकारी यांना र.रू.१५,०००/- प्रजनन व बाल आरोग्य (RCH), राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP)अंतर्गत मानधनावर कार्यरत असलेले शहर कार्यक्रम व्यवस्थापक, शहर लेखा व्यवस्थापक, लेखापाल, लिपिक, ए.एन.एम., डेटाएन्ट्री ऑपरेटर तथा लेखापाल स्टाफनर्स, वरिष्ठ डॉटस प्लस व क्षयरोग एच.आय.व्ही. पर्यवेक्षक, वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक, वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक, टि.बी.हेल्थ व्हिजीटर, पि.पी.एम. कॉर्डीनेटर, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, बालवाडी शिक्षिका व आशा स्वयंसेविका यांना र.रू.१०,०००/- तसेच

मदतनीस व ड्रायव्हर यांना र.रू.५,०००/- याप्रमाणे एप्रिल, २०२१ ते ३० जून २०२१ अखेर कोविड भत्ता देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकेड शिफारस करणेत येत आहे.

------

## मा.विधी समितीचेठराव

**विषय क्रमांक ३)** संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/५५१/२०२१, दि.०७/०६/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ४० दि. १८/०६/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' अभिनामाची १६ पदे S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००मध्ये शासन मंजूर असून४ पदे रिक्त आहेत. 'ज्येष्ठवैद्यकीय अधिकारी' अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ३१/०५/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व' वैद्यकीय अधिकारी' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवा विषयक तपशिल पडताळून, खालील वैद्यकीय अधिकारी गट–ब यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' पदावर **S-२३** वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | दि.०१/०१/२०२० रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीतील क्रमांक | वैद्यकीय अधिकारी नावं | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | १४ | डॉ.मंडपे रविंद्र नारायण | ज्येष्ठतेनुसार |
| २ | १५ | डॉ.अलवी सय्यद नासेर इब्राहीम | ज्येष्ठतेनुसार |
| ३ | १७ | डॉ.ढगे शिवाजी त्रिंबकराव | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त वैद्यकीय अधिकारी यांना **S-२३** वेतनश्रेणी र.रु ६७७००–२०८७०० मध्ये 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' पदावर,पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीनव शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठते नुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक – ४) संदर्भ : १) मा.अनुराधा गोफणे, मा.वसंत बोराटे यांचा प्रस्ताव –
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ४१ दि.०२/०७/२०२१

शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र./३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील बाब क्र.२ व ३ अंतर्गत समाविष्ठ तरतुदीनुसार दि.२५/०५/२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू असलेले कर्मचारी दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील या निर्णयानुसार पदोन्नती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाच्या जागा रिक्त असल्यामुळे श्रीम.अनघा अविनाश पाठक यांची उपअभियंता या पदावर ९ वर्षे सेवा पुर्ण झालेली असल्यामुळे त्यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या म.न.पा.अस्थापनेवरील मंजूर रिक्त पदावर सेवा नियम २०२० तसेच आकृतीबंध २०२० नुसार व त्यातील तरतुदी नुसार सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इत्यादी सर्व निकषास अनुसरुन पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यकारी अभियंता स्थापत्य ही पदे रिक्त असल्याने श्रीमती अनघा अविनाश पाठक, उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेतयेत आहे.

**-----**

## मा.शहर सुधारणा समिती

**विषय क्रमांक ५)** संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र .नरवि/कावि/११/१६८/२०२१, दि.२९/०६/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२० दि.०६/०७/२०२१

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडील मंजूर विकास योजनेतील महापालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झालेल्या क्षेत्रातील मौजे भोसरी येथील स.नं.२०९ व २१० पैकी मध्ये आरक्षण क्र.४०५ उद्यान वत्यालगत उत्तर दक्षिण १२ मी. रस्ता प्रस्तावित आहे. आरक्षण क्र.४०५ उद्यानाचे भूसंपादनानुसार १४३८२.७० चौ.मी.क्षेत्राचा ताबा दि.०७।१०।२००५ रोजी महापालिकेस भूसंपादनाने मिळालेला आहे. परंतु सदर १२ मी. रस्त्यामध्ये गरीब नागरिकांची घरे असल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांची घरे नपाडता सदर रस्ता स.नं.२१० पैकी मध्ये मनपाचे मोठ्या गटाराच्या पश्चिमेला लागून स्थलांतरीत करणेबाबत व सदर रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे क्षेत्र त्यांचेच मालकीचे स.नं. २११/१ पैकी मधून घेणेबाबत संबधित जागामालक यांनी दि.२४।०३।२००५ रोजी महापालिकेकडे प्रस्ताव सादरकेलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अर्जदाराकडून स.नं.२११।१ चे ७।१२ नुसार त्यांचे मालकीची जागा दर्शविणारा मोजणी नकाशा घेऊन रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी.क्षेत्राचा रितसर ताबा घेऊन तदनंतरच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर १२ मी.रस्त्याची आखणी व आरक्षणाची स.नं.२११/१ मधील ताब्यात घेतलेल्या २२४४चौ.मी.क्षेत्रासह होणारी सुधारित हद्द असा फेरबदलाची कार्यवाही करणेचे प्रस्तावास तत्कालीन मा.आयुक्त यांनी दि.२५।११।२००५ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने संबधित जागा मालक यांचेकडून ७/१२ उतारा, रस्ता स्थलांतरीत केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्राची मोजणी नकाशा, टायटल सर्च रिपोर्ट तसेच यु.एल.सी. बाबत र.रू.३००/- चे मुद्रांकावर शपथपत्र व बंधपत्र लिहून घेण्यात आलेले आहे. सदर ताब्यात घ्यावयाच्या क्षेत्र बक्षिसपत्राने ताब्यात

घेणेकामी बक्षिसपत्राचा मसुदा तसेच मालकी बाबत कायदा सल्लागार, पिपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दि.२२।०६।२००९ रोजी अभिप्राय घेवून अर्जदाराकडून शपथपत्र बंधपत्र लिहून घेऊन दि.१० सप्टेंबर २००९ रोजी रस्ता फेरबदल केल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे २२४४ चौ.मी. क्षेत्र स.नं.२११/१ पैकी मधून बक्षिसपत्राने मनपाचे ताब्यात घेण्यात आलेले आहे. सदर दस्त दुय्यम निबंधक हवेली १७ - ०८७५२, दि.३०।०९।२००९ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. तसेच सदर ताब्यात घेतलेल्या २२४४ चौ.मी.क्षेत्रासाठी फेरफार क्र.२४७१४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली असूनतसा सुधारित ७/१२ उतारा व फेरफार दि.०३।१२।२०१० रोजीच्या पत्रान्वये कामगार तलाठी, भोसरी यांनी महापालिकेकडे पाठविलेला आहे. सबब, सदर ठिकाणी आजच्या जागेवरच्या परिस्थितीनुसार विकास योजनेत बदल करणे क्रमप्राप्त आहे. सदर फेरबदला नंतर उत्तर दक्षिण १२ मी रस्त्याची भूसंपादनाची पुढील कार्यवाही करणे शक्य होईल. प्रस्तुत प्रकरणी दक्षिणउत्तर १२ मी.रस्त्यामधील गरीब नागरिकांची घरे वाचविणेचे दृष्टीने मनपाचे मोठ्या गटाराला लागून पश्चिमेकडे १२ मी. रस्ता आखणी करणेकामी व रस्ता आखणी बदलल्यामुळे आरक्षणाचे कमी होणारे स.नं. २११/१ मधून मनपाच्या ताब्यात घेतलेल्या क्षेत्रानुसार आरक्षणाचे हद्दीमध्ये महाराष्ट्र व प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व फेरबदलाची कार्यवाही करणेस व फेरबदलाची सुचना प्रसिध्द झाल्यानंतर महापालिकेस प्राप्त होणा-या हरकती/सुचना अर्जांबाबत संबधितांना सुनावणी देणे तद्अनुषंगीक वैधानिक प्रक्रीया पुर्णकरून फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करणे यासाठी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांना प्राधिकृत करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ६) संदर्भ – १) मा.सुनिता तापकीर, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२२ दि.०६/०७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.७९५/०७/नवि-१३, दि.९ जुलै २००८, शासन निर्णय क्र.टिपीएस १८०९/१९८५/प्र.क्र.१८९३/०९/नवि-१३, दि.१८/०८/२००९ व अधिसुचना क्र.टिपीएस-१८१२/ १६०/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ई.पी.-मंजूरी/नवि-१३, दि.०२/०३/२०१५ अन्वये मंजूर असलेल्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. दिघी-भोसरी शिवेलगत मंजूर विकास योजनेतील १५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्यीमधील मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. मधील १५.०० मी. रुंद रत्याचे आरक्षण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आहे. मौजे दिघी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.७३ व ७४ पै. मधील १५.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा.नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतुकीसाठी रस्ता विकसीत होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांच्या वाहतुकीच्या हितार्थ मौजे भोसरी व दिघी स.नं.७३ व ७४ पै. येथील सावंतनगर कमानीपासून पुढे ते बी.यु.भंडारी येथील गृहप्रकल्पापर्यंत मंजूर विकास योजनेतील १५.००

मी.रस्ता हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये ९.०० मी. करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ७) संदर्भ –१) मा.सुनिता तापकीर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समिती कडील ठ.क्र.२३ दि.०६/०७/२०२१

मौजे दापोडी येथील स.नं.३६ मधील ३०.०० मी सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजूची स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या भिंतीला लागून व यांत्रिकी भवन, दापोडी यांच्या इमारती मागील जागा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. सदर जागा ही पुर्णपणे नदी ते निळी पुररेषेखाली असल्याकारणाने सदर जागा महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागास प्रस्ताव सादर करुन त्यावर खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी व उद्यानासाठी १ हेक्टर (२.४७ एकर) क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन व म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ अन्वये वैधानिक कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ८) संदर्भ –१) मा.अनुराधा गोरखे, मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२४ दि.०६/०७/२०२१

पिंपरी चिंचवड शहरातील दापोडी व लगतचे परिसरात मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्ती असून झोपड्यांचे प्रमाण जास्त आहे. तसेच पवना नदीमुळे दरवर्षी पावसामुळे पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे दापोडी येथील स.नं.३६ मध्ये औद्योगिक विभाग तसेच निळया व लाल पुररेषात सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या उजव्या बाजून ८० गुंठे जागा कार्यशाळा व्यवस्थापक, एस.टी.महामंडळ व महाराष्ट्र शासनाकडील संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करून सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर मंजूर विकास आराखड्यामधील जागेवरील औद्योगिक विभागावर अग्निशमन केंद्राचे आरक्षण प्रस्तावित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबत कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

------

## मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे/कामे

विषय क्रमांक –९) संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.नरवि/कावि/०६/७७/२०२१
दि.१५/०६/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट मौजे ताथवडे येथे गावठणातील मिळकतींचे सिटी सर्व्हे करणेबाबत उप अधिक्षक, भूमि अभिलेख, मुळशी (पौड) यांचे दि.२५/०१/२०२१ चे पत्र मनपास प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये मौजे ताथवडे, ता. मुळशी, जि.पुणे येथील गावठाण विभागातील सिटीसर्व्हे करणेबाबत महानगरपालिकेचा संमती दर्शक ठराव करुन उप अधिक्षक भुमि

अभिलेख यांचे कार्यालयास पाठविणे बाबत कळविले आहे. सबब मौजे ताथवडे, ता. मुळशी, जि.पुणे येथील गावठाण विभागातील सिटी सर्व्हे करणेस मान्यता देणेतबाबत विचार करणे.

विषय क्रमांक –१०) संदर्भ – १) मा.अति.आयुक्त (१) आयुक्त यांचेकडील
जा.क्र.विमुका/गक्षे/कावि/४८३/२०२१ दि.१५/०६/२०२१

पिंपरी चिंचवड मनपाचे ग प्रभाग कार्यक्षेत्रात नव्याने थेरगाव येथे हॉस्पिटलचे काम अंतिम टप्प्यात असुन नजिकच्या काळात करोना विषाणुचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता करोनाच्या रुग्णाचे अलगिकरण करणे करीता तात्पुरत्या स्वरुपात थेरगाव रुग्णालयाचा वापर करणेत येणार असल्याने, वसध्या पिंपरी येथील जिजामाता हॉस्पीटल करोनाच्या पेशंट करीता वापरणेत येत असुन, त्या हॉस्पीटल मधील विज पुरवठा खंडीत झाल्यास आय.सी.यु. मध्ये, तातडीने पर्यायी विज पुरवठ्या करीता यु.पी.एस. यंत्रणा बसविणे आवश्यक असल्याने त्या कामाची पाहणी करुन कामचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्यास रक्कम रु.५५,६८,२४२/- इतका खर्च आपेक्षीत आहे. सदर कामाकरीता सन २०२१-२०२२चे अंदाजपत्रकीय तरतुद करणेत आलेली नसल्याने सदरचा खर्च मुख्य कार्यालय मध्यवर्ती भांडार विभागा कडील “कोरोना निधी” या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. सदर कामास व र.रु.५५,६८,२४२/- (अक्षरी र.रु.पंचावन्न लाख अडूसष्ट हजार दोनशे बेचाळीस फक्त) च्या खर्चास प्रशासकीय मान्याता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ११) संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.आमुका/९/कावि/१२८/२०२१ दि.७/७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत शहरातील रस्ते यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाज करण्याकरिता मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३१६४ दि.११/०९/२०१८ अन्वये शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजाकरिता आरएफपी तयार करण्याकरिता मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शहरातील १८.०० मी व त्यापेक्षा मोठ्या रस्त्यांची साफसफाई ही यांत्रिकी पध्दतीने करणेकामी मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचे मार्फत तयार करण्यात आलेला आरएफपी मसुदा दि.७/०१/२०२१ रोजी सादर करण्यात आलेला आहे. सदर आरएफपीचे अनुषंगाने दि.१९/०१/२०२१ रोजी मा.आयुक्त सो. यांचे समक्ष सादरीकरण झालेले असून त्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या सूचना सल्लागार संस्थेस देण्यात आलेल्याहोत्या. त्यानुसार मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचे मार्फत दि.१९/०१/२०२१ रोजी सुधारित आरएफपी मसुदा सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार शहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची चार भागांमध्ये विभागणी करण्यात आलेली असून त्यामध्ये Southern side of head officeचे २ पॅकेज व Northern side of head officeचे २ पॅकेज अशा रितीने ४ पॅकेज निश्चित करण्यात आलेले आहे.पॅकेज क्र. १ करिता २२१.६८ किमी, पॅकेज क्र. २ करिता २३६.०२ किमी, पॅकेज क्र. ३ करिता २३९.८६ किमी आणि पॅकेज क्र. ४ करिता २३०.६९ किमी इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length) ९२८.२५ गृहीत धरण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी.पेक्षा जास्त रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात

आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या मनुष्यबळाबाबतची माहिती आरएफपी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Package Details | Contractual Sweeper (Required with Mechanized Sweeping Machines) | Driver (for Mechanical sweepers, transport vehicles & water tankers) | Operator for Mechanical Sweepers | Helper for transport vehicles and water tanker | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Package – 1 (Southern side of head office Ward – ABDG) | 96 | 10 | 7 | 3 | 116 |
| 2 | Package – 2 (Southern side of head office Ward – BDGH) | 96 | 10 | 7 | 3 | 116 |
| 3 | Package – 3 (Northern side of head office Ward – CHE) | 96 | 10 | 7 | 3 | 116 |
| 4 | Package – 4 (Northern side of head office Ward – ACF) | 96 | 10 | 7 | 3 | 116 |
| **Total** | | **384** | **40** | **28** | **12** | **464** |

तसेच यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजा करिता आरएफपी मध्ये २४ स्विपींग मशीन ८ हूक लोडर व ४ पाण्याचे टँकर्सची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, वाहनांच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. सदर निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असून त्याकरिता अंदाजे र.रु.४६३.९४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१) निविदा कालावधी हा ७वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे प्रावधानआहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता अधिनियमातील कलम ७२(ब)नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु.४६३.९४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्षखर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आरएफपी मसुद्यामध्ये निविदा प्रक्रियेपूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काहीबदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहनसंख्या, अंदाजित / प्रत्यक्षखर्च इ. सदर बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना राहतील.

३) निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

४) यापुर्वी मा. स्थायी समितीकडील ठराव क्र.८३५८ दि.०८/०२/२०२१ अन्वये सदरच्या विषयास मान्यता देवून, सदरचा विषय मा. महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता

मिळणेकामी शिफारस करणेत आलेली होती. तथापी मा. महापालिका सभा ठरावक्र.६०९ दि.१८/०३/२०२१ अन्वये दफ्तरी दाखल करणेत आलेला होता.

५) तथापीI) Construction & Demolition Waste Arrangement Rule 2016, (II) Hazardos& other waste (Management &Transboundry Management) Rule 2016 (III) Solid Waste Management Rule 2016 (IV) E-Waste (Management) Rule 2016 (V) Biomedical Waste (Management &Hanling) Rule 2016 (VI) Plastic Waste Management Rule 2016या व्यतिरिक्त मनपा परिसरामध्ये पर्यावरण संरक्षणाचे दृष्टीने विविध कायदे अस्तित्वात असून त्यानुसार वेळोवेळी योग्यती कार्यवाही करणे मनपास बंधनकारक आहे.(Environment Protection Act 1986, Waste Prevention & Control Pollution) Act 1974 Air (Prevention & Control of Pollution) Act 1981तसेच स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत दरवर्षी केंद्रामार्फत शहराची पाहणी करणेकामी प्रतिनिधी येत असतात. त्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, शौचालय साफसफाई, रस्ते साफसफाई इ. सर्व साफसफाईच्या कामांचे मूल्यांकन केले जाते.तसेच माझी वसुंधरा अंतर्गत गुणांकन केले जाते. त्यानुसार शहरातील रस्ते यांत्रिक पध्दतीने साफसफाई (रोड स्वीपरद्वारे) कामकाज करणे हे आवश्यक आहे.

६) महासभा, विविध विषय समिती कामकाज नियम मधील मुद्दा क्र. ७६ नुसार सभेस हजर असलेल्या सभासदांपैकी किमान निम्म्या सदस्यांनी पुनर्विचाराच्या प्रस्तावाच्या बाजूने मत दिले असेल व अशी मते किमान पाच असतील, त्याखेरीज समितीने एकदा निकालात काढलेला कोणताही प्रश्न ३ महिन्यांच्या मुदतीत पुन्हा विचारार्थ घेता येणार नाही. असे नमूद आहे. त्यानुसार सदरचा विषय हा दप्तरी दाखल होऊन, ३ महिने पुर्ण झालेले आहेत.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता तयार करण्यात आलेल्या निविदा / आर.एफ.पी. नुसार ७ वर्षे कालावधी करिता निविदा प्रक्रिया राबविणे कामी व त्यापोटी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक –१२) संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.कर/मुख्य/९/कावि/१८९/२०२१
दि.२८/०६/२०२१

महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्रमांक टीडीएस २०२०/९/प्र.क्र.५०२/पर्यटन, दि.३ डिसेंबर २०२० चे आदरतिथ्य क्षेत्रास औदयोगीक दर्जा देण्याबाबतच्या शासन निर्णयाचे अवलोकन करणे.

--------

## <u>समित्यांचे अहवाल</u>

### <u>मा.विधी समिती</u>

**विषय क्रमांक १३ )** अ) कार्यपत्रिका क्रमांक१३, दि.०४/०६/२०२१चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) कार्यपत्रिका क्रमांक१४, दि.१८/०६/२०२१चा सभावृत्तांत कायम करणे

-----

### <u>मा.शहर सुधारणा समिती</u>

**विषय क्रमांक १४)** **अ)** कार्यपत्रिका क्रमांक १२, दि.०४/०५/२०२१चा सभावृत्तांत कायम करणे.
**ब)** कार्यपत्रिका क्रमांक १३, दि.१५/०६/२०२१चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

### <u>मा.शिक्षण समिती</u>

**विषय क्रमांक १५)** कार्यपत्रिका क्रमांक ०७, दि.१८/०२/२०२१, दि.२३/२/२०२१ व ४/३/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणे.



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/ ५ /कावि/७४२ /२०२१
दिनांक : ०९ /०७/२०२१

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

आदरातिथ्य क्षेत्रास औद्योगिक दर्जा देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : टीडीएस २०२०/९/प्र.क्र. ५०२/पर्यटन,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- ०३ डिसेंबर, २०२०.

**संदर्भ :-** गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमटीसी -०३९९/प्र.क्र.२०१/पर्यटन, दि.७/४/१९९९.

**प्रस्तावना :**

आदरातिथ्य क्षेत्र हा पर्यटन व्यवसायातील मुख्य सेवा उद्योग आहे आणि महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. याद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. तसेच हा व्यवसाय राज्याला परकीय चलन मिळवून देण्याचे एक परिणामकारक साधन आहे. कोविड-१९ च्या नंतर राज्याची आर्थिक स्थिती पूर्वपदावर येण्यास या क्षेत्राचा निश्चितच मोठा हातभार लागणार आहे. मात्र कोविड-१९ मुळे सद्यस्थितीत या क्षेत्रावर अत्यंत प्रतिकुल परिणाम झाला असून अंदाजे २.८ लाख इतकी रोजगार हानी झाली आहे.

२. राज्यात पर्यटन व्यवसायाची नियोजनबध्द व योग्य वाढ साध्य करण्यासाठी व राज्यात उच्चतम पर्यटन साधन संपत्ती असलेल्या क्षेत्रांचा अग्रक्रमाने, जलदगतीने विकास होण्याच्या दृष्टीने उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी गृह विभाग, शासन निर्णय क्र. एमटीसी ०३९९/प्र.क्र.२०१/पर्यटन, दि. ०७ एप्रिल, १९९९ अन्वये राज्यातील पर्यटन व्यवसायांतर्गत काही पर्यटन घटकांना उद्योगाचा दर्जा देण्यात आला आहे. परंतू काही कारणास्तव त्याची अंमलबजावणी झाली नाही.

३. प्रतिवर्षी ८.५% दराने वाढ होण्याची तसेच राज्याच्या सकल उत्पन्नात अंदाजे ५५ बिलियन डॉलर्स इतकी वाढ होण्याची क्षमता पर्यटन क्षेत्रामध्ये आहे. त्याचबरोबर या क्षेत्रामध्ये सन २०३० पर्यंत ६० लाख नवीन रोजगार निर्मिती होऊ शकते. आदरातिथ्य क्षेत्र हे पर्यटन व्यवसायाचे सर्वात महत्वाचे अंग आहे. कोविड-१९ मुळे क्षेत्रावर विपरित परिणाम झाला असून पर्यटन या क्षेत्रास पुनरुज्जीवित करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून दि.१ एप्रिल, २०२१ पासून वीज दर, वीज शुल्क, पाणी पट्टी , मालमत्ता कर, विकास कर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्याची बाब शासनच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

१) केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून दि.१ एप्रिल, २०२१ पासून वीज दर, वीज शुल्क, पाणी पट्टी, मालमत्ता कर, विकास कर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्यात यावी.

२) केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत नसलेल्या हॉटेल व्यावसायिकांनी किमान मुलभूत दर्जा (Basic Minimum Standards) प्राप्त करण्यासाठी विहित निकषांची पूर्तता केल्यानंतर औद्योगिक दराने कर / शुल्क आकारणी करण्यात यावी. त्याकरीता एक तज्ञ समिती नेमून राज्याचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही दोन महिन्यात पूर्ण करण्यात यावी.

३) त्यानंतर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया राबवून निकषांची पूर्तता करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांना औद्योगिक दराने कर / शुल्क आकारणी लागू करण्यात यावी.

४) हा शासन निर्णय, मंत्रीमंडळाच्या दिनांक ५.११.२०२० रोजी झालेल्या बैठकीस दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०२०१२०४१७११५९६६२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Valsa R. Nair Singh

Digitally signed by Valsa R. Nair Singh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=ALL INDIA SERVICES, postalCode=400032, st=Maharashtra,
Date: 2020.12.04 17:18:11 +05'30'

(वल्सा नायर-सिंह)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री(पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
७. मा. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.

९. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.

१०. मा. सर्व विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई

११. मा. सर्व विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई

१२. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई

१३. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर

१४. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.

१५. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य

१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.

१८. सर्व विभागीय आयुक्त.

१९. सर्व जिल्हाधिकारी.

२०. सर्व महानगरपालिका आयुक्त.

२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

२३. निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.

****